# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११००१

पीबीएक्स- ०२०-२६१२६६२८/२६१२६७८५/२६११४०६४ फॅक्स- ०२०-२६१२७००४/२६१३२४०१

Email :- dirmktms@gmail.com website :- www.mahapanan.maharashtra.gov.in


जा.क्र. पणन ५/कृउबास/इले/काटा/तोलाई/२०२० 12381 दिनांक :- ९ जुलै, २०२०

प्रति,

१. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ , गुलटेकडी ,मार्केटयार्ड , पुणे-३७
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
४.सभापती/ सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)

**विषय :- इलेक्ट्रॉनिक काट्यावर वजन करण्यात येत असलेल्या शेतमालावरील तोलाईबाबत...**

**संदर्भ :** - १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पणन-५/कृउबास/इले/काटा/तोलाई/२०१४, दि.१६.१२.२०१४
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे दि.२२.१२.२०१४ रोजीचे आदेश
३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे आदेश क्र. कृबास-०८१६/प्र.क्र.५०७/११-स, दि.०१.१२.२०१८
४. जा.क्र. कृपमं/बास/इले.वका.पॅकबंद/तोलाई अहवाल/१६८४/१९, दि.२२.०८.२०१९
५. शासनाचे पत्र जा.क्र. कृबास-०८१९/प्र.क्र.४२६/११-स, दि.१९.०९.२०१९
६. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पणन-५/कृउबास/इले/काटा/तोलाई/४२८५/२०१९, दि.१९.०९.२०१९
७. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.पणन-५/कृउबास/तोलाई संदर्भात/७७४/२०, दि.२८.०२.२०२०
८. शासनाचे पत्र जा.क्र. कृबास-०८१९/प्र.क्र.४२६/११-स, दि.२४.०६.२०२०

उपरोक्त विषयाचे अवलोकन व्हावे.

२. उपरोक्त संदर्भ क्र. १ पत्रान्वये, ज्या बाजार समितीच्या आवारात इलेक्ट्रॉनिक वजनकाटे बसविण्यात आले आहेत, अशा ठिकाणी शेतमालाचे वजन होत असेल तेथे कुठल्याही प्रकारची तोलाई न आकारणेबाबत व त्याची कपात शेतकऱ्याच्या शेतमालाच्या देयकातून वसूल न करण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते.

तथापि, मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. १२३६६/२०१९ व १२३६८/२०१९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने निर्णय घेऊन, उपरोक्त संदर्भ क्र. ८ अन्वये दि.२४.०६.२०२० रोजी या कार्यालयास असे कळविले आहे की, दि.१६.१२.२०१४ रोजीच्या पणन संचालक कार्यालयाने दिलेल्या सूचना रद्द करून, इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर वजन होत असले तरी सुध्दा तोलाई कशी अनुज्ञेय आहे, तसेच पॅकबंद शेतमालावर देखील तोलाई का देणे आवश्यक आहे याबाबत सुधारित सूचना पणन संचालक, पुणे यांनी तात्काळ निर्गमित कराव्यात.

३. उपरोकत संदर्भ क्र. २ अन्वये राज्य शासनाने महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या कलम ४३ खाली, राज्य शासनास प्राप्त अधिकारानुसार या कार्यालयाचे दि.१६.१२.२०१४ रोजीच्या आदेशास दि.२२.१२.२०१४ रोजी स्थगिती दिली होती. तथापि, राज्य शासनाच्या स्थगिती आदेशाविरूध्द मा. उच्च न्यायालय मुंबई येथे सांगली चेंबर्स ऑफ कॉमर्स व इतर यांनी दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक ६२३८/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०७.०७.२०१७ रोजी, राज्य शासनाचे दि.२२.१२.२०१४ रोजीच्या स्थगिती आदेशावर दोन महिन्याचे आत निर्णय घेण्याचे स्पष्ट करून याचिका निकाली काढली आहे. राज्य शासनाने या कार्यालयाचे संदर्भ क्र. १ च्या आदेशास दिलेली स्थगिती दि.०१.१२.२०१८ रोजी उठविण्यात आली आहे.

४. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशास अनुसरून निर्णय घेणे आवश्यक असल्याने, मा. मंत्री महोदय (पणन) यांचे अध्यक्षतेखाली दि.०९.११.२०१७ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पणन संचालक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याच्या निर्णय झाला. त्यास अनुसरून या कार्यालयाने दि.२८.११.२०१८ रोजी शासनास असे कळविले की, दि.१६.१२.२०१४ रोजीचे परिपत्रक/निर्देश हे पणन संचालनालयाने निर्गमित केले असल्याने व न्यायालयामध्ये दाखल असलेल्या रिट याचिकामध्ये पणन संचालकांना देखील प्रतिवादी करण्यात आलेले असल्यामुळे, याबाबत पणन संचालक ऐवजी अप्पर निबंधक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करणे न्यायोचित होईल.त्यानुसार इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर शेतमालाचे वजन करण्यात येत असेल तसेच पॅकबंद शेतमालावर तोलाई आकारावी किंवा कसे? याबाबत सर्वंकष विचार करून शिफारस करण्यासाठी दि. ०८.०१.२०१९ रोजीचे शासन निर्णयाअन्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने याबाबतचा अहवाल उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये दि.२२.०८.२०१९ रोजी शासनास सादर केला आहे.

५. शासनाचे उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये सदर अहवाल दि.१९.०९.२०१९ रोजी या कार्यालयास पाठविला असून, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व त्याखालील नियम, १९६७ तयार करण्यात आले, त्यावेळी बाजार समितीत शेतमाल विक्री करण्यासाठी आणण्याची पध्दत व आताची पध्दत यात मोठ्या प्रमाणावर बदल झालेला आहे. त्यामुळे APMC Act, १९६३ व त्याखाली केलेले नियम, १९६७ अधिनियम व नियमातील तरतूदी, त्यात अलिकडे केलेल्या सुधारणा लक्षात घेऊन, सध्याच्या बाजार समितीमधील शेतमालाची वजन करण्याची पध्दत/यंत्रणा/अद्यावत साधने व रिट याचिका क्र.६२३८/२०१६ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिलेले आदेश लक्षात घेऊन दि.१६.१२.२०१४ रोजीच्या परिपत्रकातील सुचनांचा फेरविचार करून, योग्य त्या सुधारित सूचना देण्याचे कळविले होते.

६. शासनाचे उपरोक्त पत्रास अनुसरून, या कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्र. ६ अन्वये दि.१९.०९.२०१९ रोजी, सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांना सद्यस्थितीत या कार्यालाने दि.१६.१२.२०१४ रोजीच्या निर्गमित केलेल्या सूचनांची अंमलबजावणी तुर्तास थांबविण्यात यावी असे कळविण्यात आले. तसेच शासनास या कार्यालयाने उपरोक्त संदर्भ क्र. ७ अन्वये दि.२८.०२.२०२० रोजी अहवाल सादर करण्यात आला.

७. शासनाचे उपरोक्त संदर्भ क्रमांक ८ दि. २४.६.२०२० रोजीच्या सूचनास अनुसरून या कार्यालयाचे दि.१६.१२.२०१४ रोजीचे परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

८. राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समितीतील इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर वजन करण्यात येणाऱ्या पॅकबंद शेतमालावर तोलाई आकारणी संदर्भात शिफारस करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालानुसार, इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर वजन होत असेल तरी सुध्दा तोलाई कशी अनुज्ञेय आहे, तसेच पॅकबंद शेतमालावर देखील तोलाई का देणे आवश्यक आहे याबाबत खालीलप्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व खालील नियम, १९६७ मध्ये तसेच बाजार समितीच्या उपविधीमध्ये शेतमालाचे वजन करणेविषयक आणि, मापाडी या घटकासाठी नेमणूक/अनुज्ञप्ती देणे, त्यांचे कामकाज इ. बाबीसंदर्भात आवश्यक त्या तरतूदी केलेल्या आहेत. नियम २(१२) नुसार मापाडी हा बाजार समिती कायद्यान्वये मान्यताप्राप्त घटक आहे. कायद्यातील कलम ७ अन्वये मापाडी/तोलणार यांना परवाना देण्याची तरतूद आहे. तसेच नियम १५ अन्वये बाजार आवारामध्ये नियमित शेती उपन्नाचे वजन हे मापाडीद्वारे करण्याची तरतूद आहे.

२) मापाडी हा घटक कृषि उत्पन्न बाजार समिती तसेच शेतकरी, व्यापारी व बाजार समितीतील इतर घटकांच्या दृष्टीने महत्वाचा व कायदेशीरदृष्ट्या आवश्यक घटक आहे.

३) बाजार समितीच्या आवारात आलेला कोणताही नियमित शेतमाल, विक्रीसाठी किंवा साठवणूकीसाठी आला असेल तरी, अशाप्रकारे बाजार येणाऱ्या सर्व प्रकारच्या शेतमालाचे वजनमाप अनुज्ञप्तीधारक मापाड्याकडून होणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक व बंधनकारक आहे.

४) इलेक्ट्रॉनिक वजनकाट्याच्या वापरामुळे अचूक वजनमाप मिळण्यात सुधारणा झाली असली तरी मापाड्याच्या कामकाजामध्ये बदल झालेला नाही. सद्यस्थितीतीमध्ये मापाड्याने इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर वजनमाप झाल्यानंतर काटापट्टीच्या चार प्रती तयार करून संबंधित घटकांना देणे तसेच संपूर्ण गोषवाऱ्याच्या प्रती, बाजार समितीस पुरविणे या मापाड्याचा कामकाजा कोणताही बदल झाला नाही.

५) मापाड्यांनी केलेल्या मोजमापामध्ये महत्वपूर्ण मुद्यांची पूर्तता करता येते, ज्यामुळे मापाड्याने घेतलेल्या वजनमापाची नोंद/ काटापट्टी सर्व संबंधित घटकांना प्राप्त होऊन त्याचा योग्य तो ताळमेळ राहतो आणि या काटापट्टीची प्रत बाजार समितीला मिळाल्यामुळे बाजार समितीमध्ये आवक होणाऱ्या मालाचा व वजनाचा ताळमेळ होऊन बाजार फी व शासनाची देखरेख शुल्काची आकारणी करणे शक्य होते. तसेच या काटापट्टीच्या आधारे शेतमालाच्या उलाढालीचा तपशिल ठेवता येणे शक्य होते.

६) नियम १५(१) व १५(२) मधील तरतूदी लक्षात घेता बाजार आवारात येणाऱ्या सर्व शेतमालाचे ताबडतोब वजन करण्याची व्यवस्था करणे तसेच त्याचे वजन हे अनुज्ञप्तीधारी मापाड्याने करून मापाची पट्टी/काटापट्टी संबंधितांना देणे हे बंधनकारक केलेले असल्याने पॅकबंद शेतमालास वजन करण्याची आवश्यकता आहे.

७) पॅकबंद माल नियमना खाली असला व त्याचे वजन केले नाही तर कृषि उत्पन्न बाजार समितीला त्यावरील बाजार फी व शासनाचे देखरेख शुल्क आकारणीचा प्रश्न देखील निर्माण होऊ शकतो.

८) पॅकबंद शेतमालाच्या अधिकृत वजनाची नोंद त्यांच्या बाह्य आवरणावर असणे तसेच ती कोणत्या यंत्रणेने प्रमाणित केले आहे या बाबी लक्षात घेणे, तसेच काही पॅकबंद मालाच्या वजनामध्ये बाष्पीभवन, लिकेजेस इ. मुळे वजनातील फरकाच्या नोंदी घेणे याचा विचार करता पॅकबंद शेतमालाची तोलाई करणे आवश्यक आहे.

तथापि, यासंदर्भात शासन आणि मा. सर्वोच्च/ उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय/ आदेश सर्व बाजार समित्यांवर आणि बाजार घटकांवर बंधनकारक राहतील.

वरीलप्रमाणे सूचना बाजार घटकांना निर्गमित करण्याची जबाबदारी कृषि उत्पन्न बाजार समितीची राहील, याची नोंद घ्यावी.

( सतिश सोनी )
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत -माहितीसाठी सविनय सादर :-

१. मा. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रत-

१. निवड संचिका.